देवीदास बागूल

# पिसाळो

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. 92532
iRBK-0112532




मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ७ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम. ८५३९५ .... वि. ०१.०९.१३.०५
क्रमांक .३६९९.... नोंद वि. १८/३/०७
१२५३२ ३६९९

# पिसारा

## देवीदास बागूल



चित्रकार
वसंत सरवटे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. १२५३२ नो. दि.
वि.
IRBK-0112532

© देवीदास बागूल
पहिली आवृत्ती १९६८। १८८९

मुद्रक : मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण, पुणें २.

प्रकाशक : ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन ३५ सी, ताडदेव रोड मुंबई २४ डब्ल्यु बी

७५३६५
१८/3/७१

प्रिय वसंतराव (सरवटे)
मुलांसाठी तुम्ही काहीतरी
लिहीणार आहात म्हणून-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

कोंबडा
कबुतर
मोर
कोकिळ
पोपट



# कोंबडा

पावसाळा असो की हिंवाळा असो, पहाट झाली म्हणजे पहिल्या प्रथम जाग येते पक्ष्यांना. क्षितिजावर शुक्र उगवताच झाडाझाडांवर त्यांचा किलबिलाट सुरू होतो. आपण त्या वेळी अर्धवट झोपलेले आणि अर्धवट जागे असतो. त्यामुळे त्या किलबिलाटात अंगणातल्या चिमण्यांचा चिवचिवाट जास्त आहे की पारावरच्या कावळ्यांची कावकाव अधिक आहे याचा नीट उमज पडत नाही. पण या सगळ्या कोलाहलातून एक आवाज उमटून पडतो. कारण तो चांगलाच खणखणीत आणि लांबलचक असतो.




एखादी तुतारी फुंकल्यासारखा हा आवाज असतो कोंबड्याचा ! 'कुकूऽऽ च कूऽऽ' म्हणून कोंबड्याने आरोळी ठोकली म्हणजे थोडा वेळ तरी सगळ्या पक्ष्यांचे आवाज फिके पडतात आणि ह्याचा आवाज आपल्या कानात भरून राहतो.

कोंबड्याच्या आवाजाला साधी आरोळी म्हणण्यापेक्षा किंचाळी म्हण-णेच अधिक बरोबर होईल. कारण ती आरोळी किती कर्कश आणि चिरकी असते ! पहिल्यापहिल्यांदा मला त्याचे ओरडणे मुळीच आवडत नसे. लहान भावाबहिणींनी एकदम येऊन कानात 'कुर्रर्ऽ' केल्यावर जसा मी दचकत असे तसाच ह्या कोंबड्याच्या पहाटेच्या आरोळीने दचकत असे. इतर पक्ष्यांचे

…राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा

आवाज म्हणजे पुष्कळ आवाजांचा एक गोंगाट वाटतो. जणू ते एकमेकांशी काहीतरी गुलगुल गोष्टी करीत असतात. पण कोंबडा मात्र एकांड्या शिलेदारासारखा आरोळी ठोकून स्वस्थ बसतो. शिलेदार किंवा शिपाईगडीच नाही तर काय ? तो जसा 'आलबेल बराबर हैऽऽ' असे मधून मधून ओरडतो तसाच हा कोंबडा देखील 'कुकूऽऽ च कूऽ' करून जणू काही 'दिवस उगवतोय होऽऽ' असेच सांगण्याचा सपाटा लावतो.

त्याच्या ह्या सांगण्यावर माझ्या आईचा भलताच विश्वास होता. कारण त्याची ती हाक ऐकल्याबरोबर ती कामाला लागायची. प्रथम ती दळायला बसायची. जात्याची घरघर सुरू





झाल्यावर मग मी देखील पांघरुणा-
सकट सरपटत तिच्या मांडीवर
डोके ठेवून ती घरघर, तिच्या
ओव्या आणि कोंबड्याचे आरवणे
ऐकत गुंगीत लोळत राहायचा. कधी
कधी माझ्या मनात यायचे की,
समजा, एखाद्या पहाटे हा कोंबडा
आरवला नाही तर थोड्या वेळाने
दिवस उगवणार आहे हे आईला
समजणार तरी कसे ?

कोंबड्याचा आवाज खणखणीत ललकारी दिल्यासारखा असतो तसेच त्याचे रूप एखाद्या भालदार-चोपदारासारखे ठसकेबाज आणि ऐटबाज असते. इतर पक्ष्यांचे अंग डोक्याकडून शेपटीकडे उतरते असते. पण कोंबड्याचे अंग दोन्ही बाजूंनी चढते आणि कमानदार असते. उंचावरून झोका घेत जमिनीवर उतरत यावे आणि पुन्हा आकाशात जावे तसा अनुभव कोंबड्याच्या अंगाची ठेवण बघताना येतो. पाहताक्षणीच डोळ्यात भरते ती त्याची तांबडी शिंगोरी. कलिंगडाच्या गरासारखी ही शिंगोरी मानेच्या किंचित् झटक्याबरोबर लवलव करते, तेव्हा तिचे करवतीसारखे दाते आपली नजरच कापतात. तिचा स्पर्श मात्र मखमलीच्या स्पर्शासारखा लुसलुशीत असतो. डोक्यावरची शिंगोरी ही ताठ असते तर गळ्याखालचे कल्ले (गलुल) मात्र सारखे लळतलोंबत असतात. हे लळतेलोंबते गलुल एखाद्या नखरेबाज माणसाच्या गळपट्टीवरील 'बो'सारखे शोभून दिसतात! डोक्यावरचा शिंगोरीचा मंदिल आणि गळ्यातील दुहेरी गलुलाचा तो 'बो' पाहूनच कोंबड्याची शिलेदारी ऐट पट्‌टू लागते.

पण शिलेदारपणाची ही ऐट तिथेच संपत नाही. त्याच्या शेपटीकडचा भाग डोक्याकडच्या भागाइतकाच तोलदार आणि झळाळीचा असतो. शेपटीची पिसे कोयत्यासारखी कमानदार असून शिंगोरीसारखीच थरथरणारी असतात. आणि त्यांचा रंग? तो तर दोन्ही पंखांच्या रंगां-



पेक्षा तुकतुकीत आणि सोनेरी झळाळीचा असतो. सगळ्या अंगा-वरची पिसे तांबूस किरमिजी, तपकिरी पिवळसर, कुसुंबी शेंदरी, इत्यादी दोन दोन रंगछटांची असली तरी शेपटीची पिसे मात्र निव्वळ काळसर किंवा निळसर असतात. आणि त्याला सोन्याचे पाणी दिलेले असते ! जणू काही हिवाळापावसाळ्यातल्या उषः-कालच्या रंगदार क्षितिजाचा हा




छोटासा प्रतिनिधीच ! टोपलीच्या माथ्यावर किंवा उकिरड्याच्या शिखरावर उभा राहून हा जेव्हा मान उंच करून ‘ कुकूऽऽच कूऽ ’ अशी बेंबीच्या देठापासून साद घालतो तेव्हा त्याची ऐट पहाटेच्या इतर कोणत्याही पक्ष्यांपेक्षा फार फार वरचढ ठरते. कोंबड्याला बघायचे असेल तर ह्याच वेळी बघावे. चांगले डोळे भरून बघावे. कसा ऐटीत एकेक पाऊल सावकाश टाकीत, छाती पुढे करून चालतो ! चालता चालता चहूफेर बघतो आणि पुन्हा एकदा खोल श्वास भरून साद घालतो : “ कुकूऽऽच कूऽऽ.” आणि मग आपली हाक कुणी ऐकली की

नाही ऐकली याची वास्तपुस्त न करता पुन्हा ऐटीत चालू लागतो.... एखाद्या शिलेदारासारखा !

पण दिवस चांगला ढळढळीत उजाडला तरी त्याचे आरवणे कधी कधी चालूच असते. पहाटेच्या त्या गार आणि नीरव वातावरणात त्याची साद जशी आकर्षक वाटते तशी ती उघड्या आणि गजबजलेल्या दिवसात वाटत नाही. पण त्याचे रूप आणि चालण्याची ऐट मात्र नजरेत भरते. शेपटीची ती कमानदार झुलती पिसे आणि डोक्यावरची मखमली शिंगोरी ह्यांच्यावर आपली दृष्टी खिळून राहते, आठवणीत रेंगाळत राहते.






# कबुतर

हाताच्या ओंजळीत घेतलेला पक्षी,
फुले उधळावीत तसा आका-
शात उधळावा आणि त्यानेही पंख
फडफडवून आकाशांत उड्डाण करावें.
अशा वेळी किती मनापासून आनंद-

होतो ! अशा आनंदासाठीच कबुतर पाळण्याचा छंद लहानपणी जडतो.

मात्र आकाशात उडणारे कबुतर एकटे असण्यापेक्षा ते जेव्हा एखाद्या कळपाचा नायक असते तेव्हा त्याचे उड्डाण बघण्यात अधिक गंमत असते. कळपातील कबुतरांना आपल्या मागोमाग उडायला लावण्यात त्या पुढारी कबुतराची जी चतुराई आणि धडाडी दिसते ती बघून आपला जीव अगदी हरकून जातो. सुरवा-तीला राहत्या घरट्याच्या अंगणा-भोवती चारपाच फेऱ्या मारून झाल्या म्हणजे कबुतरांचे पंख हवा धरतात. आणि मग ते आकाशात वर वर जाऊं लागतात. त्यावेळी म्होरक्या कबुतराकडे बघावे. बघता बघता तो चालू दिशा बदलून कधी डावी तर






कधी उजवी घालतो आणि सबंध कळप त्याच्या इशाऱ्यासरशी पलटी खातो. त्यावेळी कळपाच्या वळण्याची लय किती कमानदार असते !

हळूहळू सगळा थवा क्षितिजाकडे जातो आणि पार दिसेनासा होतो. थोड्या वेळाने सलामी देणाऱ्या विमानांच्या ताफ्याप्रमाणे कळपाचा त्रिकोण सरळ रेषेत क्षितिजाकडून चाल करीत येतो. तो वेग इतका झपाट्याचा असतो की, वाटते हा कळप आता कशावर तरी जाऊन धाडकन् आदळणार ! पण हाकेच्या अंतरावर तो कळप येतो न येतो तोच म्होरक्या कबुतर शेपटीचे सुकाणू फिरवून सगळा कळप दक्षिणेकडे वळवतो. त्यावेळी कळपातील कबु-तरांची लय बिघडून एकच गोपाळ-काला होतो. त्या गोपाळकाल्यात म्होरक्या–कबुतरावरील आपली नजर ढळते. पण हा गोंधळ क्षणभरच.

वाचनालय शाखा.
.................वि...................
.................नोंद दि..............

म्होरक्या कबुतर पुन्हा आघाडीवर चमकू लागतो आणि कळपाची एक लयदार आकृती होते. म्होरक्या कबुतर तर जणू काही झालेच नाही



अशा बेफिकिरीने पण मोहक ऐटीत हवा कापीत असतो.

आकाशात उड्डाणाच्या निरनिराळ्या कसरती करून दाखवणारी ही कबुतरे घरट्यात परतायला तयार कशी होतात ? परतायला तयार असली तरी त्यांना आपले घरटे नेमके कसे सापडते ? लहानपणी ह्या प्रश्नांनी माझा जीव अगदी घायकुतीला येई. पण दाही दिशांना वळसा घालणाऱ्या कबुतराच्या लक्ष्यात दिशा पक्क्या राहतात. कितीही उंचावर आणि कोणत्याही दिशेला गेलेले कबुतर आपल्या धन्याच्या घराकडे नेमके परत येत. मात्र वर गेलेला कबुतरांचा थवा लवकर परत यायला पाहिजे असेल तर त्याला खाणाखुणा कराव्याच लागतात.

म्हणून तर कबुतरखान्यावरची पोरे हातातली काळीपाढरी फडकी हालवतात आणि जोरजोराने शिट्या फुंकतात. त्या खुणा आणि त्या शिट्या ऐकून कबुतरे हळूहळू खाली उतरू लागतात. पण उंचावरून खाली आली तरी ती कबुतरे एकदम जमिनीवर बसत नाहीत.राहत्या घरांच्या अंगणावरच सातआठ घिरट्या घालतात. मग मुले घोगऱ्या आवाजात 'आऽआऽआऽ' म्हणून त्यांना बोला-




वतात. कबुतरे जमिनीवर बसायला जर अगदीच उशीर करू लागली तर खोपटातील एखादे कबुतर अंगणात ठेवावे. म्हणजे मग तो सगळा कळप त्या आपल्या सोबत्याला पाहून धाड-कन् जमिनीवर उतरतो आणि गुटर्ऽऽगू गुटर्ऽऽगू करीत घुमू लागतो, नाचू लागतो.


असे नाचणारे कबुतर फार देखणे दिसते. त्यातल्या त्यात ते कबूतर जर मोरपंखी असले तर मग फारच सुरेख दिसते. असे कबूतर मान फुगवून स्वतःभोवती रुजी घालू लागले म्हणजे त्याचा तोरा बघावा! रेशमासारखी लवलवणारी मान चांगली टर्र फुगते. अगदी गुबऱ्या टमाट्यासारखी. आणि



कबुतराचे चिमुकले डोके मागे झुकून त्या टमाट्याच्या मध्यभागी रुतून बसते. छातीवरच्या लुसलुशीत आणि अंजिरी पिसांवर ती इवलीशी चोच जणु टमाट्याचा देठच शोभते. त्या चोचीवरील दोन पांढरे बिंदू दक्षिणी स्त्रियांच्या नाकातील दोन मोत्यांच्या नथीप्रमाणे उठावदार दिसतात. आणि मागची शेपटी? त्या शेपटीतला मिटलेला पंखा तर केव्हाच झर्रकन उलगडलेला असतो. अंबाड्यात माळ-




लेल्या एखाद्या निशिगंधाच्या वर्तुळाकृति गजऱ्याप्रमाणे हा चटपटीत पंखा कबुतराच्या फुगलेल्या शरीराला किती छान तोलून धरतो ! आपल्या शरीराची अशी विविध ऐट दाखवीत ते कबुतर तुरुतुरु नाचत पुढे येते, मागे जाते आणि स्वतःभोंवती गुर्रकन गिरकी मारते. त्याच्या ह्या नाचऱ्या हालचाली इतक्या जलद आणि तरल असतात



९२८७३२
बाल वा

की, इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणे त्या एकमेकीत पार मिसळून जातात. त्यावेळी कबुतराच्या पिसांचे साधेसुधे रंगही फार आकर्षक वाटतात ! जणू काही जमिनीवर एखादे डेलियाचे फूलच थरथरत डोलते आहे !

नूरजहानलाही असेच वाटले असावें ! म्हणून तर जहांगिराच्या दोन कबुतरांपैकी एक कबुतर तिने फुला-सारखे हातात घेतले आणि वाऱ्यावर सोडून दिले. जहांगिराचे तिकडे लक्ष जाताच त्याने किंचित रागावून विचारले, "तूं कबुतर असं कसं वाऱ्यावर सोडलंस ?" नूरजहान लहान मुलासारखी अजून आपल्याच आनंदात होती. तिला बादशहाचा राग समजलाच नाही. तिला वाटल की बाद-शहाला कबुतर आकाशात उडवावे कसे ह्याबद्दल माहिती पाहिजे आहे. म्हणून तिने शिल्लक राहिलेले दुसरे कबूतर हातात घेऊन तेहि आकाशात आनंदाने उधळले आणि जहांगिरला म्हटले, "असं !" नूरजहानचा तो निष्पाप-पणा पाहून जहांगिराला राग येण्याऐवजी खुदकन हसू आले. आणि तोही हसऱ्या डोळ्यांनी आकाशात उड-णाऱ्या त्या दोन फुलांकडे पाहूं लागला.



# मोर

मला कुणी लहान म्हटले तरी चालेल ;
पण खेडेगावात एक दोन दिवस
राहायला मिळाले तर अजूनही मी
सकाळी वासुदेवाची वाट पाहतो. तो

दिसला म्हणजे त्याच्या टोपीकडे पाहत राहतो. खरे म्हणजे त्या टोपीला 'टोप' म्हणतात. त्रिकोणी डोंगराच्या आकाराचा तो टोप मला आवडण्याचे कारण असे की, त्या टोपाला पिसे असतात. मोराची पिसे ! मोराच्या पिसांची टोपी घालणारा वासुदेव मला लहानपणी मोठा भाग्यवान वाटायचा. कारण त्यावेळी एक तरी मोराचे पीस स्वतःच्या जवळ असावे असे फार वाटायचे. तसे पीस मिळाले म्हणजे मग ते हलक्या हातांनी पुस्तकात ठेवायचे. त्या पिसाला म्हणे काहीतरी खायला घालावे लागते अशी माहिती इतर मुलांकडून मिळे. काहीतरी म्हणजे विशेषतः कुंकू ! मग आईच्या करंड्यातील कुंकू त्या पिसाला देण्यात येई आणि मधल्या सुटीत किंवा सुटी झाल्यावर घरी आम्ही मुलेमुली त्या पिसाशी खेळत राहायचे. त्या पिसाच्या निळ्या डोळ्याभोवती असणाऱ्या सोनेरी हिरव्या भुवयांना बोटांनी घासायचे आणि बोटाचे कोपर पुढे धरून म्हणायचे, 'ये, ये, शीव मला.' मग त्या हिरव्या धाग्यांतले चार-पाच धागे पुढे लवून बोटाच्या कोपऱ्याला स्पर्श करीत. केवढी मजा वाटे ! कधी कधी ते पीस पुढे धरून नुसतेच पाहत बसायचे ! पिंपळाच्या पाना-सारख्या पिसावरील गडद निळा डोळा ! डोळ्याचा आकार तांबड्या भोपळ्या-सारखा बसकट गोल. वर्तुळाच्या एका कडेला काळसर निळा. भोवताली जरतारी रंगाची कवडी आणि मग सोनेरी झाक दाखविणाऱ्या हिरव्या झिरमिळ्या. म्हणजे जणू भुवयाच !

एका पिसात किती रंग आणि त्यांची रचना कशी वेधक ! वाटायचे की, हे पीस जर इतके आकर्षक, तर अशी पिसे असलेला मोर किती आकर्षक असेल ? खरेच, कधी बरे तो मोर पाहायला मिळेल ?

सध्या राणीच्या बागेत किंवा पेशवे पार्कात गेले म्हणजे मोर बघायला मिळतो. पण आमच्या लहानपणी पेशवे पार्क नव्हती आणि मुंबई दूर असायची. कधी कधी सर्कस यायची पण सर्कशीत मोर पाळत नसत. त्यामुळे मोर केवळ चित्रातच बघून समाधान मानावे लागे. सरस्वतीचे एक चित्र घरात असायचे. तिच्या पायाजवळील मोराचा पिसारा पाहून उत्सुकता अधिकच वाढीस



लागे. पण खराखुरा मोर बघायचा म्हणजे जंगलातच जायला हवे.

आणि एकदा जंगलात मोर बघायला मिळाला. आम्ही बैलगाडीतून गावाला चाललो होतो.

त्या गावची वाट जंगलातून जात होती त्या दीडदोन मैल जंगलातून जावे लागे. त्या दीडदोन मैलांच्या अंतरात एकाच ओढ्याची सात वळणे ओलांडावी लागत. काही वळणांवर जंगल थोडे विरळ असे. अशाच एका वळणावर ओढ्याच्या काठापासून जरा आत एके ठिकाणी मोर सावकाश चाललेला दिसला. ऐटीत पाय टाकीत जाणाऱ्या त्या मोराच्या मागे त्याचा लवलवणारा पिसारा पाहून मला फार मजा वाटली. राजाने पुढे चालावे आणि खांद्यावरून ओघळणारे त्याचे पाठीवरचे वस्त्र सरपटत जावे तसा मोराचा पिसारा वाटला. तो मोर काही क्षणच पाहायला मिळाला. बरे, त्याने नुसतेच दर्शन दिले. मोर नाचू लागला म्हणजे तो पिसारा फुलवतो असे म्हणतात. पिसारा फुलतो म्हणजे काय ? शिवाय त्याच्या डोक्यावर तुरा असतो म्हणे ! मोर फार दुरून दिसल्याने तो तुराही नीट दिसला नाही. त्यामुळे फार चुटपुट लागून राहिली.

आणि मग परवा परवा पेशवे पार्कात मोर अगदी जवळून पाहिला. समोरून पाहिला. पाठीमागून पाहिला. उंचावर बसलेला पाहिला. आणि नाचतानाही पाहिला. पण दरवेळेला



'पुढचे पाहावे, मागचे विसरावे' असेच झाले. ज्या बाजूने मोर पहावा तीच बाजू आधीच्याहून इतकी वेगळी आणि आकर्षक असायची की आधी पाहिलेला भाग नकळत विसरायला व्हायचा. दिसत असलेली बाजूच मनात भरून राहायची.

समोरून पाहताना आपल्या नजरेत भरते ती त्याची गडद निळी मखमली मान. मोराची मान हंसाच्या माने-इतकी लांबलचक नसते. पण बाक आणण्याइतकी तिची लांबी असल्याने तो जेव्हा जेव्हा मान वेळावतो तेव्हा

तेव्हा त्या मानेचा लोण्यासारखा लवचिकपणा स्पष्ट दिसतो. मानेवरचा तो रंग गडद निळा असूनही त्याला प्रकाशाची झळाळी असते. खरे म्हणजे त्या रंगावर प्रकाश परावर्तित होऊन स्वच्छ उजेड पडतो.

गळ्यापासून पाठीच्या मध्यभागापर्यंत एक उतरता लांबट त्रिकोण हिरव्या रंगाचा दिसतो. आणि त्याला लागून दोन्ही बाजूला दोन जरतारी रंगाचे पंख. त्या जरतारी रंगावर काळ्या रेघोट्या. त्यामुळे तो हिरवा त्रिकोण जणू ह्या जरतारी कोंदणात पाचूच्या लोलकासारखा उठून दिसतो. दृष्टी क्षणात हिरव्या लोलकावर तर क्षणात दोन्ही बाजूंच्या जरतारी पंखावर आणि मग तेथून ओझरत्या दिसणाऱ्या सोनेरी हिरव्या पिसाऱ्यावर खेळत राहते. इतक्यात मान वर करून पाहणाऱ्या मोराचे मुख आपल्या दृष्टीत भरते.

उदबत्त्यांच्या पंखा करून खोवणीत खोवल्याप्रमाणे डोक्यावरचा तुरा दिसतो. त्या तुऱ्यातल्या प्रत्येक काडीवर टिकलीएवढा अस्सल रेशमाचा जांभळा गोंडा असतो. करंगळीएवढ्या पांढऱ्या काडीवरील तो गोंडा जणू शुभ्र दोऱ्यात बांधलेल्या जांभळ्या राखीसारखा वाटतो. डोक्यावरचा छोटखानी पंख्याच्या आकाराचा हा तुरा कसा नाजूकपणे थरथरत असतो !

मानेवरील निळा, पाठीवरचा


वि.
नोंद दि.

हिरवा आणि जरतारी आणि तुऱ्याचा जांभळा ह्या नयनमनोहर रंगसंमेलनात चोचीजवळच्या डोळ्यांभोवतीचा पांढरा रंग मात्र विद्रूप वाटतो.

उंच ठिकाणी बसलेल्या मोराकडे पाठीमागून पाहिले म्हणजे त्याचा लोंबता पिसारा तेवढा दिसतो. जणू काही पिंपळपानांनी डवरलेली फांदी ! पिंपळपानांच्या फांदीत नुसता हिरवा रंग थबथबलेला असतो. मोराच्या पिसाऱ्यात कितीतरी रंग झगमगत असतात. पिसाऱ्याच्या प्रत्येक काडीला झिरमिळ्या असतात. त्या झिरमिळ्यांना सोनेरी तकाकी असते. हिरव्याकंच पानांवर सोनेरी ऊन जसे झळाळते तसा मोराच्या पिसाऱ्यातील हिरवा रंग चमकतो. मला तर तो पिसारा पाहून सोनेरी आणि हिरव्या श्रावणाची आठवण होते....

पिसारा फुलवलेला मोर पाहावा तो श्रावणातच ! जपानी पंखा क्षणात उलगडावा तसा मोर आपला पिसारा झर्कन फुलवतो आणि नागाच्या फणीसारखा आपल्या पाठीवर उभा

तोलून धरतो. त्याच्या शरिराभोवती केवढे मोठे कलाबतूचे वलय उभे राहते! त्या वलयातील पिंपळपानी पिसे नक्षत्रांसारखी चमचम करतात. वर्तुळाच्या रेषेवर टेकणाऱ्या प्रत्येक काडीच्या टोकाला संपूर्ण पिसाचा डोळा असण्याऐवजी अर्धचंद्राकृती पीस असते. त्यामुळे त्या उलगडलेल्या पिसाऱ्याची वर्तुळरेषा नागमोडी दिसते. पिसारा तोलून मोर मागेपुढे करीत नाचतो. स्वतःभोवती गिरकी घेतो. कधी सबंध अंग स्तब्ध रोखून फक्त पिसारा हलवतो. त्यावेळी पिसाऱ्यातली काडीन् काडी एकमेकीला स्पर्श करीत दिड्‌दिड् असा आवाज करते. त्या काड्यांचे थरथरणे सतारीच्या कंपित तारांसारखे वाटते ते त्या दिड्‌दिड् आवाजामुळे तर नव्हे ना? त्या तशा थरथरत्या पिसाऱ्याला आकाशातून ओघळणाऱ्या रुपेरी धारांची केवढी तरी सळसळणारी पार्श्व-




भूमी प्राप्त होते ! म्हणूनच मोराचे नाचणे बघावे ते पावसाच्या धारांचा नाच चालू असताना ! ते दृश्य पाहत असताना आपला सगळा जीव त्या पिसाऱ्यात गुंगून जातो.



मोर म्हटला की माझ्या डोळ्यासमोर निळा, हिरवा आणि सोनेरी जरतारी रंगांचे आल्हादमय संमेलनच उभे राहते. म्हणूनच हिमालयातील मोतिया रंगाचा शुभ्र मोर मला आवडला तरी स्मरणात राहत नाही.

स्मरणात राहतो तो फक्त त्याचा पिसारा. श्रावण महिन्यात सूर्योदयाचे सोनचाफी किरण विरळ मेघातून पसरले म्हणजे प्रकाशाचा एक झगमगता पिसाराच उभा राहतो. हिवाळी धुक्यात झाडाच्या फांद्यातून सूर्यकिरणाचा, नारळीच्या शेंड्याच्या झिरमिळ्यांचा....असे कितीतरी पिसारे मग मोराची आठवण ताजी करतात.... मोर सारखा मनात नाचत ठेवतात.



# कोकिळ

एखाद्या समारंभाची तयारी हळूहळू होत यावी. पताका, तोरणे लावून व्हावीत. कमानीकमानींतून पाने, फुले माळलीं जावीत. गर्द जांभळ्या मख-मली गालिचांनी बैठक सजवून तयार असावी. उदबत्तीची सुगंधी धूपवलये

वातावरणात पसरू लागावीत. एकेक म्हणता म्हणता सर्व मंडळींनी जमाव. समारंभाची व्यवस्था शिगेला पोचावी आणि मग नकळत सर्वांच्या मनात उत्कंठा निर्माण व्हावी की केव्हा येणार ? खरेच, समारंभाचा मुख्य पाहुणा केव्हा येणार ?

वसंतऋतू येऊन पंधरवडा लोटला म्हणजे माझ्याही मनात असाच प्रश्न निर्माण होतो की केव्हा येणार ? वसंतोत्सवाच्या रंग आणि गंध यांच्या सौंदर्यात आपल्या स्वरांच्या सौंदर्याची भर घालणारा कोकीळ पक्षी केव्हा येणार ?

वसंतपंचमी साजरी केल्यावर आपण लवकरच येणाऱ्या वसंतऋतूची वाट पाहू लागतो. शिशिराने शुष्क केलेल्या झाडाझाडांवर वसंताच्या हिरव्या खुणा शोधू लागतो. आंब्याला फुटलेल्या तांबूस पालवीने आपण हरखतो. हळूहळू निंबालाही पालवी फुटते. तिळाएवढ्या फिकट पांढऱ्या फुलांची चवरी लागते. मग शिरीषाला अंजिरी रंगाची फुले लगडतात. जकारांडा निळसर जांभळ्या फुलांचे घोस घेऊन उभा राहतो. शंकासुराची पिवळीं फुले तरारतात. शुभ्र मोगऱ्याचा गंध पहाटे दरवळतो. वसंत-



ऋतूचा उत्सव चांगलाच भरतो. पण पण ह्या सगळ्या सौंदर्याला स्वरांशिवाय पूर्णता येत नाही.

तसे पाहायचे तर ह्या वेळी इतर पक्ष्यांचे आरटन चालूच असते. पण ते आरटन इतर ऋतूंतही असते. त्यामुळे वसंताचे म्हणून ते खास वाटत नाही. म्हणूनच आपले मन नव्या आरटनाची वाट पाहत बसते. आणि केव्हातरी, आपले लक्ष रंगीत पानाफुलात रमलेले असताना, ‘ कुहू ऽ ऽ कुहू ’ असे स्वर कानांवर पडतात.

त्या स्वरांमुळे मन एकदम चकित होते, आनंदित होते. सगळे लक्ष कानांत गोळा होते. आला, कोकिळ पक्षी आला !


पण आलेला कोकिळ पक्षी ऐकायला मिळाला तरी पहायला मात्र मिळत नाही ! खरे म्हणजे ओरडलेला कोणताही पक्षी थोडा प्रयत्न केला तर आपल्याला पाहायला मिळतो. कोंबडा पहाटे आरवला तरी दुपारीही आरवतो. त्यामुळे पहाटे दिसला नाही तरी दिवसा दिसतो. कोकिळ मात्र असा सहज दिसत नाही. कोकिळाची साद कानावर पडताच आपण त्याला





शोधायला जावे; पण छे ! नाव नको. मान वाकडी करून कितीही पाहिले तरी गजबजलेल्या हिरव्या पानांतून त्याला शोधणे कठीण होऊन बसते. कधीकधी माणूस हट्टालाच पेटतो. 'कुहूऽऽकुहू' कानावर पडले म्हणजे जर तो रस्त्यावर चालत असेल तर त्या ठिकाणीच तो थबकतो. घरी बिछान्यात असेल, तर ताडकन बाहेर येतो, आणि दबा धरून बसतो. पण मग 'कुहु कुहु' च बंद होते ! कंटाळून आपण मागे फिरलो की, पुन्हा अचानक कानांवर 'कुहूऽऽ कुहू' येऊन आदळते. छे ! छे ! असे का करतो हा कोकिळ ? हा त्या

रातराणीच्या पंथातील तर नाही ना? ती देखील अशीच जीव घेते! रातराणी देखील असाच धुंद करणारा सुगंध वाऱ्यावर उधळते. पण केव्हा? जेव्हा रात्र होते तेव्हा! त्या अंधारात



तिला कसे शोधायचे? कोकिळाच्या बाबतीतही तसेच घडते. मला तर परवा परवापर्यंत त्याचे दर्शन घडले नव्हते. पण परवा हिंगण्याला अचानक दर्शन घडले. दुपारची वेळ होती. सगळीकडे शांत होते. आणि पडवीत एकदम गिल्ला झाला की, 'कोकिळ बघा, कोकिळ!' आम्ही सर्वजण धडपडत, कोलमडत बाहेर आलो. अंगणात एक चापयाचे झाड होते. पाने थोडी विरळ होती. त्यामुळे फांद्या आरपार दिसत होत्या. एका फांदीवर 'तो' बसला होता. होता काळाच. कावळ्यासारखा. आकाराने मात्र नव्हे! कावळा हा अब्दुल-गब्दुल दिसतो, थोटका दिसतो. हा कोकिळ शेलाटा दिसतो. शेपटी कावळ्याच्या शेपटीपेक्षा पल्लेदार. चोचही आटोपशीर आहे. चांगला


आहे, खरेच अवलख वारूसारखा आहे! ह्यानेच आजवर आपल्याला फरफटत आणले नाही का? आपल्यालाच काय, जगातील सर्वांनाच हा अपार कुतूहलाचा विषय झाला आहे

असे म्हणतात की, पशुपक्ष्यांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना कोकिळ ह्या पक्ष्याने जगातील कोणत्याही पक्ष्यापेक्षा अधिक आकर्षित केले आहे. पुष्कळ विद्वानांनी याच्यावर लेख आणि पुस्तके लिहिली आहेत. ह्या विद्वानांना कोकिळ पक्ष्याविषयी एवढे आकर्षण का वाटले? ते कारण वेगळेच आहे. सर्वसाधारणपणे इतर पक्षी आपली अंडी स्वतःच उबवतात. कोकिळ पक्षी मात्र आपली अंडी दुसऱ्या पक्ष्यांच्या घरट्यात ठेवून त्यांच्याकडून ती उबवून घेतात! ह्या विचित्र वागण्यानेच शास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या ह्या विचित्र वागण्याच्या उपमा साहित्यात दिल्या जातात. शिवाय त्या पक्ष्याबद्दल इतरही पुष्कळ दंतकथा आहेत. त्या सर्व दंतकथांमध्ये मला आवडली ती मात्र 'कुहूकुहू' ह्या त्याच्या ओरडण्यासंबंधींची.



एका कोकिळेला दोन मुले होती. एके दिवशी ते दोघे फळे शोधण्याकरिता जंगलात जातात. सुरवातीला ते दोघे बरोबरच उडतात. पण नंतर नकळत दोघे दाट जंगलात घुसताना परस्परांपासून दूर जातात. संध्याकाळ होते. घरी परतण्याची आठवण प्रत्येकाला होते. तेव्हा लक्षात येते की, दुसरा कुठे आहे ? मघा इथे तर होता ! मग आता कुठे गेला ? कितीही दूरवर पाहिले तरी दिसत नाही ! इकडेतिकडे धावाधाव केली तरी पत्ता नाही. गेला तरी कोठें हा ? पण आपल्याशीच बोलून काय उपयोग ? त्यालाच मोठ्याने साद घालावी झाले. आणि मग प्रत्येकजण साद घालतो, "कुठं आहेस तू ? कुठ आहस तू....कुहू ऽ कुहू....कुहूऽ कुहू ?"

मला ती कथा फार आवडली. जणू काय ती हाक अजूनही वातावरणात घुमते आहे. आजही कोकिळाचे कूजन ऐकले की, तिचे ओरडणे कसे झंकारल्यासारखे वाटते. तंबोऱ्याची तार छेडल्यावर जसा स्वर निनादत राहतो तसे 'कुहूकुहू' काही क्षण निनादत राहते. इतर पक्ष्यांचे आरटन तुकडा मोडल्यासारखे काडकन् तुटते. पण कोकिळ पक्ष्याचे 'कुहूकुहू' पाण्याच्या लाटांप्रमाणे हळूहळू विलय पावते.




कोकिळाचे गायन दिवसाच्या प्रहरी वेगवेगळे वाटते. कच्च्या पहाटे जेव्हा कोकिळ 'कुहू कुहू' सुरू करतो तेव्हा ते कुजन फार तरल वाटते. जणू काही हळूवारपणे तो इतरांना जागे व्हायला सांगतो. स्वतः किती लवकर उठला आहे तो! स्वतःचे ते लवकर उठणे कुणाला तरी कौतुकाने सांगण्याकरिता तो लाडे लाडे 'तुम्ही कुठं आहात! आम्ही तर उठलो!' असे म्हणत असावासे वाटते. पण किती वेळ झाला तरी कोणीच प्रतिसाद देत नाही हे काही बरे नाही. म्हणूनच त्याच्या सादेत थोडी चीड भरल्यासारखी होऊन तो 'कुहु कुहू'चा सपाटाच लावतो....

भर दुपारी उन्हाने सगळे चराचर आळसते. वारा पडतो. डोळ्यात पेंग येते. तोच कानावर 'कुहू कुहू' येते. त्या वठलेल्या वातावरणावर उल्लासाचे अंकुर उमलतात. फार फार बरे वाटते....

एप्रिल महिन्याच्या प्रारंभापासूनच कोकिळाचे कर्णमधुर आलाप ऐकू येऊ लागतात. युरोपमध्ये व ध्रुव-प्रदेशातही उन्हाळ्याच्या दिवसातच






कोकिळाचे कूजन सुरू होते. वर्षाच्या इतर ऋतूंमध्ये तो आफ्रिकेत असतो असे म्हणतात! उन्हाळ्याच्या सुरुवातीस प्रथमतः कोकिलबुवा येतो व थोड्याच दिवसांत कोकिलबाई येऊन धडकतो. दिवसाप्रमाणेच रात्रीही याचे गाणे चालूच असते.

जसजसा ग्रीष्मऋतु संपण्याच्या बेतास येतो तसतशी या कोकिळांच्या आवाजातील माधुरी कमी होऊं लागते. नंतर पुढें ग्रीष्मऋतू संपला की, याचें कूजन बंद होते व जुलैच्या मध्याला किंवा फार झाले तर जुलैअखेरनंतर यांचा पत्ताही लागत नाही.

कोकिळा आपले अंडे दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यांत ठेवण्याच्या कामी आपले चातुर्य चांगलेच दाखविते. डर्मस्टॅट परगण्यातील ॲडाल्फ मुलर नावाच्या एका आदिवासी माणसाने दुर्बिणीच्या साहाय्याने या संबंधीचा प्रकार पहिल्यांदा पाहिला. कोकिळा ही आपले अंडे हळूच आपल्या चोचीत धरून दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यात

कशी ठेवते, यासंबंधीची समग्र हकी-
गत त्याने दिली आहे. ज्या पक्ष्याच्या
घरट्यात कोकिळा आपली अंडी ठेवते



त्या पक्ष्यांची अंडी ती बाहेर फेकून देते आणि त्या जागी आपली अंडी ठेवते! नंतर ते इतर पक्षी ह्या अंड्यांना आपली अंडी समजून संगोपन करतात. कधी कधी त्या इतर पक्ष्यांचे आणि कोकिळेचे भांडण होते. पण शेवटी हरप्रयत्नाने कोकिळा आपली अंडी त्या घरट्यात घुसडतेच.

पण जेथे कोकिळ पक्षी लवकर दिसण्याची मारामार, तिथे हा समर-प्रसंग कसा दिसणार?

ते भांडण दिसले तरी कोकिळ-बद्दलचे माझे आकर्षण कमी होणार नाही. त्याचे 'कुहुकुहू' ऐकले की ज्याला देहभान राहील तो स्वरांचा वेडा आहे असे कसे म्हणावे? वसंतऋतूला झाडांझाडांतून, फुलापानांतून बहरलेला पाहून ज्याला कोकिळाची आठवण होणार नाहीं त्याला वसंतोत्सव पूर्ण समजला असे म्हणता येईल काय?

# पोपट

तुम्ही एखादी इटुकलीशी वडाची फांदी उडत जातांना पाहिली आहे काय ? हिरवीगार पाने आणि लाललाल उंबरे असलेली फांदी एकदम हवेत उडते आणि सुळकन् दुसऱ्या झाडावर जाऊन बसते, असा देखावा तुम्हांला कधी दिसला आहे का ? नसेल दिसला. कारण झाडाची फांदी उडणार कशी ? तिला थोडेच पंख असतात ? पण जेव्हा एखादा पोपटांचा थवा भुर्रकन् इकडून तिकडे उडत




जातो, तेव्हा मात्र त्यांची वाकडी-तिकडी रांग हुबेहूब वडाच्या फांदीसारखी दिसते. हिरव्याहिरव्या पंखांची पाने आणि लालचुटुक चोचींची उंबरे ! मात्र ती झाडाची फांदी नसून पोपटांची रांग आहे हे त्यांच्या आरडाओरडीमुळे . चटकन् ओळखता येते. हवेतून तीरासारखा उडत जाताना पोपट भयंकर कर्कश आवाज करतो. पोपटाचे असे स्वैर उडणे आणि ओरडणे बघायचे असेल तर त्यासाठी गावाबाहेरील रानावनातच जायला हवे. विशेषतः ज्या भागात फळझाडे अधिक आहेत अशा रानात किंवा बागेत. कारण पोपटाला जीं निरनिराळी फळे खाण्यासाठी लागतात ती त्याला रानावनात सहज मिळू शकतात.

गोजिरवाण्या दिसणाऱ्या ह्या पोपटाचे खाणे मात्र अव्यवस्थित असते. 'खाणे थोडे आणि पटका भारी' अशी त्याची रीत असते. बागेत फळाची नासाडी करण्यात पोपटाची प्रसिद्धी आहे. पिंजऱ्यातला पोपटसुद्धा किती घाण करतो हे पोपट पाळणाऱ्यांना चागले माहीत असते. सर्वसाधारणतः पोपट निरनिराळी फळे खातो हे खरे. पण ऑस्ट्रेलियातील एका जातीचा पोपट नुसत्या शाका-

हारावर समाधान मानीत नाही. तो मांसाहारसुद्धा करतो. तो मेंढीवर हल्ला चढवितो आणि तिचे मांस खातो. एवढा एक अपवाद सोडला तर सगळे पोपट रानावनातील फळांवरच ताव मारतात.

ही फळे मिळण्याची सोय आपो-आप झाली तर रानातला राघू तुमच्या घरी पिंजऱ्यातला 'मिठ्ठू' म्हणून आनंदाने राहतो आणि शिकवाल तसे बोलतो! खरे म्हणजे पोपट पाळतात तो त्याच्या बोलण्याच्या ह्या गुणामुळेच. मंजुळ आवाजात गाणारे पक्षी पुष्कळच असतात, पण माणसासारखे बोलणारे फार थोडे. त्या फार थोड्या पक्ष्यांमध्ये पोपट उत्तम बोलतो.

पण पोपट जे काही बोलतो, त्यांतले त्याला एक अक्षरही समजत नाही. एखादा शब्द किंवा एखादे वाक्य वारंवार त्याच्या कानांवर पडले म्हणजे तो ते वाक्य जसेच्या तसें म्हणून दाखवतो. आपण 'मिठ्ठू, ऊठ' असे म्हटले की, तोही 'मिठ्ठू, ऊठ' असेच म्हणतो. आवाजाची हुबेहुब नक्कल करून दाखविण्यात पोपट फार तरबेज असतो. तो केवळ



शब्दांचीच नक्कल करतो असे नाही, तर कुत्र्याचे भुंकणे, मांजराचे गुरगुरणे किंवा बाळाचे रडणे ह्यांची सुद्धा कधी कधी तो सहीसही नक्कल करून दाखवितो. रानावनांतील कर्कश आवाजापेक्षा त्याचे हे बोलणे आकर्षक असते. पण त्याच्या ह्या बोलण्यापेक्षाही पोपट जी शीळ वाजवतो ती अधिक मोहक असते!

मला स्वतःला मात्र पोपटाचे बोलणे किंवा शीळ वाजविणे ह्यापेक्षा त्याचा आकार आणि रंग ह्या गोष्टीच अधिक आवडतात. पंखांचा हिरवागार, चोचीचा तांबडा आणि कंठाचा काळा रंग असलेला हा तिरंगी पक्षी किती नितळ आणि स्वच्छ दिसतो! खरे सांगायचे म्हणजे त्याच्या पंखांच्या रंगाला काही पानांचा हिरवा रंग म्हणता येणार नाही. तो रंग खास त्याचाच असतो. म्हणूनच त्याच्या ह्या रंगाला त्याच्याच नावाने ओळखले पाहिजे. एवढ्यासाठीच 'पोपटी हिरवा' असे म्हटले जाते. त्या पोपटी हिरव्या रंगावर ती सुपारीएवढी लालभडक चोच कशी उठून दिसते! पोपटाची ही चोच अगोदर हिरवीच होती म्हणे! मग ती तांबडी कशी झाली? त्याची एक मजेशीर कथा आहे.

एकदा खूप थंडी पडली होती. जो तो शेकोटी पेटवून शेकत बसला होता. पक्षी आपापल्या घरट्यात पंखांमध्ये डोके खुपसून कुडकुडत होते. अशा वेळी एका पोपटाला एक शेकोटी दिसली. शेकोटीजवळ कुणीही नव्हते. म्हणून तो उडत उडत तेथे गेला. पण शेकोटीतला निखारा विझत



चालला होता. त्या निखाऱ्यावर खूप राख जमली होती. पोपटाने थोडा पालापाचोळा आणला आणि निखाऱ्यावर टाकला. आणि मग तो फूं फूं करू लागला. थोड्या वेळाने एकदम जाळ झाला. त्या जाळात त्या पोपटाची चोच सांपडली आणि विस्तवासारखी लालभडक झाली !

पण हे काही खरे नव्हे. कारण सगळ्याच पोपटांच्या चोची काही लाल नसतात. काहींच्या काळ्या तर काहींच्या पिवळ्या असतात. ज्याची चोच पिवळी असते त्याचे पंख तांबडे असतात आणि चोच काळी असली पंख निळे असतात. पण खरे म्हणजे चोचींच्या आणि पंखांच्या रंगांचे काही कोष्टक सांगता येणार नाही. आपल्या हिंदुस्थानात मात्र सरसकट हिरवे पंख आणि तांबड्या चोचींचेच पोपट आढळतात. ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिका या खंडात पोपटांच्या शेकडो जाती असतात. त्यांचे आकारही किती तऱ्हेतऱ्हेचे असतात ! न्यू गिनीमधील पोपट केवळ तीन इंच लांबीचा. हा सगळ्यात छोटा म्हणावा लागेल. ऑस्ट्रेलियांतील काकाकुवा मात्र चांगला लांबलचक म्हणजे तीन फूट लांबीचा असतो. शेपट्यांचे सुद्धा किती प्रकार ! कुणाची शेपटी अर्धवट मिटलेल्या पंखासारखी. काकाकुव्याला तर

डोक्यावर तुरासुद्धा असतो.

मोठ्या पोपटांपेक्षा छोटेखानी पोपटच अधिक गोजिरवाणे दिसतात. मुठीएवढे अंग आणि वीतभर लांब लवलवती शेपटी असलेला चिमुकला पोपट फार सुंदर दिसतो. मात्र असा पोपट एकटादुकटा बाळगण्यात गंमत नाही. ते चांगले चारपाच तरी असावेत. त्यांना राहायला झोपडीच्या आकाराचा पिंजरा असावा. मग असा पिंजरा किती भरलेला दिसतो ! दारातून जाता येताना ते जेव्हा आपल्याला 'मिठ्ठू' म्हणून हाक मारतात तेव्हा फार फार बरे वाटते ! कधी सवड असली तर पिंजरा टेबलावर ठेवावा. दार उघडून त्या छोट्यांना हाताबोटांवर घ्यावे. त्यांना शीळ घालून दाखवावी. त्यांची गोड शीळ ऐकत बसावे आणि त्यांचा निळसर आकाशी रंग पाहात राहावे !

IRBK-0112532

मराठी ग्रंथ संग्रहालय, ... शाखा.
अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

कोंबडा
कबुतर
मोर
कोकिळ
पोपट



किंमत चार रुपये